IFLA Section
**Environment, Sustainability and Libraries**

**IFLA विभाग**
**पर्यावरण, शाश्वतता आणि ग्रंथालये**

जानेवारी २०२२

## हरित ग्रंथालय म्हणजे काय ?

पर्यावरण म्हणजे असे वातावरण किंवा परिस्थिती ज्यात मानव, संस्था (परिसंस्था), प्राणी व वनस्पती राहतात आणि काम करतात. पर्यावरण हे नैसर्गिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक असू शकते.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यातील पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला धोका न पोहोचवता वर्तमानकालीन गरजा पूर्ण करतो. (आपले सार्वजनिक भविष्य, ब्रन्डलँड रिपोर्ट, यू एन)

पर्यावरण हे हवामान बदल व सामाजिक असमानतेसह इतर धोक्यांमुळे नष्टप्राय होण्याच्या मार्गावर आहे.सर्व संघटनांनी शाश्वत विकासाच्या मार्गाने पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करावा. यात सर्व प्रकारची ग्रंथालये  समाविष्ट आहेत, जी शाश्वत विकासात सक्रिय आणि महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

हरित आणि शाश्वत ग्रंथालय हे असे ग्रंथालय आहे जे पर्यावरण, आर्थिक आणि सामाजिक शाश्वततेचा विचार करते. हरित आणि शाश्वत ग्रंथालय हे कोणत्याही आकाराचे असू शकते पण त्यांच्याकडे शाश्वत विकास कार्यक्रम पत्रिका असायला हवी जिच्यामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव व्हावा:

• **हरित इमारती आणि उपकरणे**: इमारती आणि उपकरणांमधून होणारे उत्सर्जन आणि कार्बनच्या पाऊलखुणा सक्रियतेने कमी केल्या आहेत.

• **हरित कार्यालय तत्त्वे**: कार्यात्मक दिनचर्या आणि प्रक्रिया पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत आहेत.

• **शाश्वत अर्थव्यवस्था**: उपभोग मर्यादित (प्रतिबंधित) आहे, परिपत्रीय (वर्तुळाकार/पुनर्वापर)  आणि सहभागी अर्थव्यवस्था पद्धतींना प्रोत्साहन दिले जाते आणि त्या समुदायाला उपलब्ध करून दिल्या जातात.

•  **शाश्वत ग्रंथालय सेवा**: प्रासंगिक आणि अद्ययावत माहिती वापरकर्त्यांसाठी सहजपणे उपलब्ध आहे, सामायिक जागा, उपकरणे आणि पर्यावरण शिक्षण प्रदान केले जाते आणि कार्ये प्रभावी आहेत. ग्रंथालयाचा कार्बन हँडप्रिंट सकारात्मक आहे.

• **सामाजिक शाश्वतता**: चांगले शिक्षण, साक्षरता, समुदाय सहभाग, अंतर-सांस्कृतिक विविधता, सामाजिक समावेश आणि एकूण सहभाग यांचा विचार केला जातो. ग्रंथालय असमानता कमी करण्यासाठी सक्रियपणे कार्य करते.

• **पर्यावरण व्यवस्थापन**: पर्यावरणीय ध्येये SMART (विशिष्ट, मोजण्यायोग्य, साध्य करण्यायोग्य, वास्तववादी आणि कालबद्ध) आहेत आणि ग्रंथालय पर्यावरणावरील स्वतःचा नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी कार्य करते. ग्रंथालयाचे पर्यावरणीय धोरण, त्याची अंमलबजावणी आणि पर्यावरणीय कामाचे परिणाम व्यापक प्रेक्षकवर्गास कळविले जातात.

• **सामान्य पर्यावरणीय ध्येये आणि कार्यक्रमांसाठी वचनबद्धता**: यु एन शाश्वत विकास ध्येये, पॅरिस हवामान बदल करार आणि संबंधित पर्यावरण प्रमाणपत्रे आणि कार्यक्रमांद्वारे वचनबद्धतेला मार्गदर्शन केले जाते.

**भाषांतरकार - सुप्रिया नवले (Supriya Nawale)**